# ऋणनिर्देश

**राम दोतोंडे यांच्या काव्यलेखनाची वैशिष्ट्ये : 'रापी जेव्हा लेखणी बनते' व 'गल्ली बदललेला मोर्चा' या काव्य संग्रहाच्या आधारे** – ह्या विषयावर मी संशोधन करायचे ठरविले. **एम.फिल.** परीक्षेसाठी हा विषय जेव्हा मला देण्यात आला, तेव्हा प्रारंभी माझी अवस्था संभ्रमीत अशीच होती. पण माझे मार्गदर्शक **डॉ. सुनील चंदनशिवे** यांनी जे मला मार्गदर्शन केले त्यांचे माझ्यावरचे ऋण मी विसरू शकत नाही. विद्यार्थ्यांना मदत करावी, आपला विद्यार्थी नावारूपाला यावा म्हणून स्वत: सर जातीनिशी विद्यार्थ्यांशी हितगुज साधत राहिले. त्यांच्या अडीअडचणी समजावून घेत राहिले. कुठेही, कधीही न रागवता आत्मीयतेने मार्गदर्शन करीत राहिले. त्यांचे हे प्रेम, जिव्हाळा आमच्या पाठीवरती असाचा रहावा अशी मी विनंती करते. त्यांना या कामात सहकार्य करणाऱ्या त्यांच्या **सौभाग्यवती सौ.चंदनशिवे** आणि **त्यांची मुले** यांचेही मी आभार मानते. कारण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कुटुंबाकडे थोडे दुर्लक्ष होते, पण त्यांनी तसे कधीही भासविले नाही. हसतमुखाने त्यांनी आमचे स्वागत केले. याचा सानंद अभिमान वाटतो.

ह्या लघु प्रबंधिके संदर्भात शिवाजी विद्यापीठाचे माजी विभाग प्रमुख **डॉ. कृष्णा किरवले** यांनी याच विषयावर आपण संशोधन करा असे मला सुचविले. कारण वाङ्मयाच्या क्षेत्रात विविध लेखकांच्या साहित्य कलाकृतीवर संशोधन झाले पाहिजे ही त्यांची प्रांजळ भूमिका होती. त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानून मी हे शिवधनुष्य पेलू शकले, याबद्दल **डॉ. किरवले सरां**चे आभार.

या ना त्या निमित्ताने मराठी विभागात वेळोवेळी मला सहकार्य करीत गेले ते मराठी विभाग प्रमुख **डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. हिमांशु स्मार्थ** आणि **विभागातील कार्यालयीन कर्मचारी** यांचेही मी आभार मानते.

मला लागणारी पुस्तके उपलब्ध करून देण्यामध्ये **बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ** यांच्या **कार्यालयीन सेवकां**चे आभार.

ही लघु प्रबंधिका वेळेत टाईप करुन देणाऱ्या **अक्षर टायपिंगचे श्री. गिरीधर सावंत आणि सौ. पल्लवी सावंत** यांचे आभार. तसेच ह्या प्रबंधिकेचे मुद्रीत शोधन करणाऱ्या **सौ. मेधना फडके** यांचेही आभार. प्रबंधिकेचे बायंडींग करुन देणारे **शिवकुमार थोरवत, श्रीकांत टाईपरायटर्सचे नंदू देसाई व गंगाधर देवेकर** यांचेही आभार.

माझा संसार, माझी मुले यांच्याकडे लक्ष देत हे काम करताना माझी तारेवरची कसरत होत होती. पण या कामात सहकार्य करणारे माझे पती **डॉ. शशिकांत चौधरी**, मुले **स्वप्नील, आकाश** आणि **सगळे आप्तस्वकीय** यांचे सहकार्य नसते तर ही लघु प्रबंधिका वेळेत आकाराला आलीच नसती. तेव्हा त्यांचे आभार न मानता त्यांच्या ऋणात राहणेच मी पसंत करेन. **माझी आई, भावंडे, बहिणी** यांनी मला जे प्रोत्साहन दिले ते मी विसरू शकत नाही. त्या सर्वांचे आभार. माझ्या **महाविद्यालयातील प्राचार्य**, माझे **विभाग प्रमुख, माझे सहकारी, मित्र–मैत्रिणी** यांच्या सहकार्यामुळेच मी हे शिवधनुष्य पेलू शकले; आणि स्वत: **कवी राम दोतोंडे** यांनी या पुस्तकावर आलेले जे लेखन पुरविले त्या सर्वांचेच आभार.

**कु. सुमित्रा रेवणसिद्ध शिंदे**